दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २३ मधील तरतुदीच्या अनुषंगाने तक्रार निवारण अधिकारी नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन आदेश क्र. मुविनि-२०१९/प्र.क्र.१०२/ऊर्जा-५
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक : ३० जुलै, २०१९

संदर्भ: (१) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६
(२) सह सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.५००/ऊर्जा-२, दि. २९/०७/२०१९.

शासन आदेश

केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २३ मधील तरतुदीनुसार विद्युत निरीक्षणालयातील कार्यालयांमध्ये दिव्यांग व्यक्तींच्या तक्रारी स्विकारणे, त्याबाबतच्या नोंदी ठेवणे व सदर तक्रारींचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण अधिकारी म्हणून वरील संदर्भ क्र. २ मधील सूचनेनुसार खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अधिकाऱ्यांची याद्वारे नेमणूक करण्यात येत आहे.

अ. क्र.	कार्यालयाचे नाव	तक्रार निवारण अधिकाऱ्याचे पदनाम
१.	मुख्य विद्युत निरीक्षक यांचे कार्यालय, मुंबई	विद्युत निरीक्षक, मुख्य विद्युत निरीक्षक यांचे कार्यालय, मुंबई
२.	अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर	संबंधित अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर
३.	सर्व विद्युत निरीक्षक कार्यालये	संबंधित विद्युत निरीक्षक

२. सर्व संबंधित कार्यालयांनी या आदेशास योग्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०७३०१३४७०५८६१० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prashant Pundlik Badgeri

Digitally signed by Prashant Pundlik Badgeri
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=07ae22a8e7fa4047ce6ff816d85e77eec14db9926b325a140acf9b28bb990786, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundlik Badgeri
Date: 2019.07.30 17:42:20 +05'30'

(प्र. पुं. बडगेरी)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१. मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पू.) मुंबई-७१.
२. अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
३. सर्व विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.
४. प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
५. सह सचिव (अ.क.२), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
६. सह सचिव (ऊर्जा-२), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
७. उप सचिव (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
८. निवडनस्ती (ऊर्जा-५)